# कुळगांव-बदलापूर नगरपरिषद, कुळगांव

आवक क्रमांक/कु-ब. न. प./बां. प. ५५२

कुळगांव-बदलापूर नगरपरिषद कार्यालय,

कुळगांव

दिनांक : २०/६/०८

प्रति

~~मे. एस. एस. कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री प्रदीप गुलाबचंद जैन व इतर द्वारा श्रीमती भारती पी. जामगावकर (इंजिनिअर) कुळगांव~~

सर्वे नं. ७३ हि. नं. ५पु (पै) सि.स.नं. प्लॉट नं. ३८५८

कुळगांव येथे बांधकाम करण्याच्या मंजूरी बाबत.

संदर्भ :- आपला दि. २०/४/०८ चा

~~श्रीमती भारती पी. जामगावकर (इंजिनिअर)~~

वास्तुशिल्पकार यांचे मार्फत सादर केलेले अर्ज.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये.

सर्वे नं. ७३ हि.नं. ५पु (पै) सि.स.नं. — भूखंड क्रमांक ३

कुळगांव मध्ये ४८०.४६ चौ.मी. भूखंडाच्या विकास करावयास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. २०/४/०८ च्या अर्जास पुढील शर्तीस आधिन राहून तुमच्या मालकीच्या आणि हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे स्टील्ट, तळ मजला, पहिला मजला, दुसरा मजला, ~~तिसरा-चौथा-पाचवा-सहावा-सातवा-मजला,~~ रहिवासासाठी/ऑफिस/दवाखाना/शाळेसाठी/गॅरेज/वाले मिळोच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम परवाना/ प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

-: अटी :-

१. बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध असेल नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नुतनीकरण मुदत संपण्यापूर्वी आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्षे करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करताना नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांचा व नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

२. नकाशात ________ रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३. जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहील व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपरिषदेकडे पाठविणे आवश्यक राहिल.

४. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

५. ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

६. बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटी प्रमाणे करता येईल. जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे व त्यानंतरच पुढील बांधकाम करावे.

दस्त क्र. उहन-२ ३३३९/२०.. ६७६८ २२

दस्त क्र. उहन-४ ५५०८/२०२४ २५/४०